माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**
**तक्रार क्रमांक : ४७/२०१९**

**तक्रारकर्ता, श्री.दत्तराव साहेबराव जाधव,**
**मु.पो.शिरपुर जैन, ता.मालेगाव, जि.वाशिम**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,**
**मातोश्री कासाबाई दाभाडे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय,**
**शिरपुर जैन, ता.मालेगाव, जि.वाशिम**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),**
**जिल्हा परिषद वाशिम, ता.जि.वाशिम**

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : २५.०९.२०२३**

**तक्रारकर्ता** : उपस्थित
**जन माहिती अधिकारी** : उपस्थित
**प्रथम अपिलीय अधिकारी** : अनुपस्थित

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्जाचा दिनांक |
|---|---|---|
| ३१.०८.२०१७ | -- | २८.०५.२०१९ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र.२६०८/२०१४ दि. ३१.०८.२०१७ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीवर दिनांक २५.०९.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.अशोक अतुल काळे हे उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील (अपील क्र.२६०८/२०१४) मध्ये दिनांक ३१.०८.२०१७ रोजी सुनावणी घेवून " अपिलार्थीस माहितीचे प्रदान झाले असल्यामुळे प्रस्तुतचे अपिल निकाली काढण्यात येत आहे. " असे आदेश पारित केले होते.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेला खुलासा व तक्रारकर्ता यांचे युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, तक्रारकर्ता यांनी द्वितीय अपील क्र.२६०८/२०१४ यात दि. ३१.०८.२०१७ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार अनुपालन झाले नसल्याचे नमुद करीत तक्रार अर्ज

दाखल केला असून तक्रारकर्ता यांचे म्हणण्यानूसार त्यांना प्रदान करण्यात आलेली माहिती ही अपूर्ण असून त्यांचे माहिती अर्जातील सेवापुस्तकाची प्रत, शिक्षक हजेरी पट याबाबतची माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांनी आजपर्यंत टाळाटाळ केलेली असल्याने सदर माहिती त्यांचे स्वत:शी संबंधीत असून अति आवश्यक असल्याने नमूद केले असून जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नसल्याने त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील नमूद तरतुदीनूसार कठोर कार्यवाही करण्यात यावी, अशी विनंती केली आहे. त्यानुषंगाने आज झालेल्या सुनावणी दरम्यान प्राचार्य, मातोश्री कासाबाई दाभाडे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय शिरपूर जैन, ता.मालेगांव, जि.वाशिम यांनी दि.३१.०८.२०१७ रोजी पारित आदेशाकडे लक्ष वेधले असून तक्रारकर्ता यांनी कार्यालयीन अभिलेखावर उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती तसेच वरील माहिती सुनावणी दरम्यान मागितली असून संबंधीत संस्थेतील व्यवस्थापनेतील असलेल्या बाधामुळे काही माहिती उपलब्ध नसल्याबाबतचा खुलासा तसेच कर्मचाऱ्यांचे सन २००९-१०, २०१०-११, २०११-१२, २०१२-१३ या कालावधीतील हजेरी पत्रक इत्यादी बाबीचा समावेश आहे. या सर्व बाबी लक्षात घेता, तक्रारकर्ता यांचे सेवापुस्तिकेचे संबंधीत शिक्षण संस्थेत उपलब्ध असलेली अथवा शिक्षणाधिकारी कार्यालयात उपलब्ध असलेली सेवापुस्तिकेची छायांकीत प्रत तसेच आज कार्यालयात सादर करण्यात आलेल्या माहितीचा एक संच तक्रारकर्त्यास तात्काळ व विनामुल्य प्रदान करण्याच्या निर्देशासह प्रस्तुत तक्रार अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे.

**आदेश**

**उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून सदर तक्रार अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ
सत्यमेव जयते
अमरावती विभाग

(राहुल भा.पांडे)
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : २५.०९.२०२३**

जावक क्रमांक ९२७८ दिनांक 20 FEB 2024

Vishal D. Ingale-2023/